संक्षिप्त

बुलेटप्रेमींसाठी 'ट्रायम्फ'चा प्रवेश

नाशिक : मुंबई नाका येथे वासन ट्रायम्फ या नव्या दालनाचे उद्घाटन वासन बजाजचे संचालक प्रदीप वासन यांच्या हस्ते करण्यात आले. या दालनातून ग्राहकांना ट्रायम्फ मोटरसायकल्सची विक्री, अधिकृत सुटे भाग, रायडिंग गिअर तसेच विक्रीनंतरच्या सेवांचा एकत्रित अनुभव मिळणार आहे. ट्रायम्फ मोटरसायकल्स हा १९०२ मध्ये स्थापन झालेला प्रसिद्ध ब्रिटिश मोटरसायकल ब्रँड असून, आकर्षक ब्रिटिश रचना, उत्कृष्ट अभियांत्रिकी, आधुनिक तंत्रज्ञान आणि दमदार परफॉर्मन्ससाठी तो जगभरात ओळखला जातो. नाशिकमध्ये सुरू झालेल्या दालनामुळे शहरातील तसेच जिल्ह्यातील मोटरसायकलप्रेमींना ट्रायम्फच्या विशेष मोटरसायकल्सचा अनुभव आता अधिक सहज उपलब्ध होणार आहे. नव्या दालनात केवळ मोटार सायकल विक्रीच नव्हे तर, विक्रीपश्चातची सेवा उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यामुळे ट्रायम्फ ग्राहकांना इतर शहरांवर अवलंबून राहण्याची गरज भासणार नाही. दालनास भेट देऊन ट्रायम्फच्या मोटारसायकल चालवून पाहण्याची अनुभूती घ्यावी, असे आवाहन वासन यांनी केले.

अशोक सोनवणे यांच्या काव्यसंग्रहाला पुरस्कार

नाशिक : येथील उगले परिवाराच्या वतीने दगूबाई बापूराव उगले स्मरणार्थ पहिला काव्य पुरस्कार चोपडा येथील ज्येष्ठ साहित्यिक अशोक सोनवणे यांच्या 'परिस्थितीच्या दुसेरी खाली' या काव्यसंग्रहाला जाहीर झाले. आयोजक कवी राजेंद्र उगले, संजय उगले आणि विजय उगले यांनी ही माहिती दिली. महाराष्ट्रातून आलेल्या ४४ काव्यसंग्रहांतून 'परिस्थितीच्या दुसेरीखाली' या संग्रहाची निवड परीक्षक कवी विवेक उगलमुगले आणि गझलकार जयश्री वाघ यांनी केली. रोख तीन हजार रुपये, सन्मानचिन्ह आणि मानपत्र असे पुरस्काराचे स्वरूप असून वितरण २७ सप्टेंबर रोजी हुतात्मा स्मारकात स. ११.३० वा. ज्येष्ठ कीर्तनकार बापूराव महाराज उगले यांच्या हस्ते होणार आहे. ज्येष्ठ साहित्यिक विजयकुमार मिठे, विवेक उगलमुगले, जयश्री वाघ, रवींद्र मालुंजकर, सुरेश पवार उपस्थित राहणार आहेत.

'किसान ड्रोन' खरेदीसाठी अनुदान

जिल्ह्यातील ४८ लाभार्थी शेतकरी गटांना लाभ

लोकसत्ता प्रतिनिधी

नाशिक : जिल्ह्यातील शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाचा लाभ मिळवून देण्यासाठी कृषी यांत्रिकीकरण उपअभियानांतर्गत 'किसान ड्रोन' घटकाचा समावेश करण्यात आला असून, जिल्ह्यातील ४८ लाभार्थी शेतकरी गटांना ड्रोन खरेदीसाठी एकूण चार कोटी ८० लाख रुपयांचे अनुदान देण्यास तांत्रिक मंजुरी देण्यात आली आहे. यामुळे शेतीतील फवारणीसह विविध कामांसाठी ड्रोन तंत्रज्ञानाचा वापर वाढण्यास मदत होणार असल्याची माहिती जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी रवींद्र माने यांनी दिली आहे.

पालकमंत्री गिरीश महाजन यांच्या संकल्पनेतून आणि नियोजन समितीचे सदस्य सचिव तथा जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा नियोजन समितीच्या २०२६-२७ मधील नाविन्यपूर्ण योजनेतून हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. या घटकासाठी प्रति ड्रोन १० लाख रुपये किंमत गृहीत धरून प्रत्येक ड्रोनसाठी ९० टक्के अनुदान देण्यात येणार आहे. त्यानुसार ४८ ड्रोनसाठी एकूण ४ कोटी ८० लाख रुपये अनुदानाची तरतूद करण्यात आली आहे. कृषी यांत्रिकीकरण उपअभियानाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार जिल्हा नियोजन समितीच्या नावीन्यपूर्ण योजनेत 'किसान ड्रोन'चा समावेश करण्यात आला आहे. इतर घटकांसाठी ४० ते ५० टक्के अनुदान अनुज्ञेय असले तरी या योजनेअंतर्गत किसान ड्रोनसाठी ६० ते ९० टक्के अनुदान देण्यात येणार असल्याचे आदेशात नमूद आहे. प्राप्त अर्जांमधून आदिवासी महिला गट/कंपनी, अदिवासी गट/कंपनीला प्रथम प्राधान्य देण्याचे निर्देश आहेत. ड्रोनची खरेदी कृषी अभियांत्रिकी संचालनालय, पुणे यांच्याकडे नोंदणीकृत कंपनीकडूनच करावी लागणार आहे.

मान्यताप्राप्त संस्थेत प्रशिक्षण आवश्यक

लाभार्थींना ड्रोन संचालनासाठी नागरी विमान वाहतूक महासंचालनालय मान्यताप्राप्त संस्थेत मोफत प्रशिक्षण देण्याची तरतूद करण्यात आली आहे. निवड झालेल्या लाभार्थ्यांना पूर्वसंमती दिल्यानंतर ३० दिवसांच्या आत ड्रोन खरेदी करणे बंधनकारक राहणार आहे. योजनेच्या फलनिष्पत्तीचा त्रयस्थ संस्थेमार्फत आढावा घेऊन लाभ घेतल्यानंतर सहा महिने ते दोन वर्षांपर्यंत अहवाल सादर करण्याची तरतूदही करण्यात आली आहे. या उपक्रमाच्या अंमलबजावणीची सर्वस्वी जबाबदारी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, नाशिक यांच्यावर राहणार आहे. तांत्रिक मंजुरी आदेश कृषी संचालक (कृषी अभियांत्रिकी संचालनालय), कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या स्वाक्षरीने जारी करण्यात आल्याचे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी माने यांनी कळविले आहे.

कागदपत्रे पडताळणीस ६३ उमेदवार अनुपस्थित

आश्रमशाळा शिक्षक भरती

लोकसत्ता प्रतिनिधी

नाशिक : आदिवासी विकास विभागांतर्गत नाशिक विभागातील आश्रमशाळांमधील शिक्षक संवर्गातील गट-क (अराजपत्रित) पदे भरण्यासाठी पवित्र पोर्टलमार्फत शिफारसप्राप्त ५८८ पैकी ५२५ उमेदवारांची कागदपत्र पडताळणी प्रक्रिया पूर्ण झाली. कागदपत्रे पडताळणीस ६३ उमेदवार अनुपस्थित राहिले. पडताळणी झालेल्या पात्र उमेदवारांना लवकरच नियुक्तीपत्र वितरित केले जाणार आहे.

नाशिक अपर आयुक्त कार्यालयाकडून शासकीय आश्रमशाळांमधील शिक्षक संवर्ग भरतीसाठी ५८८ उमेदवारांच्या मुळ शैक्षणिक अर्हता कागदपत्र पडताळणीचे सविस्तर वेळापत्रक प्रसिद्ध करण्यात आले होते. त्यानुसार पेठरोडवरील एकलव्य मॉडेल रेजिडेन्शियल स्कूल येथे एकूण १४२ पैकी १२० उमेदवार कागदपत्रे तपासणीला उपस्थित होते. तर २२ उमेदवार अनुपस्थित होते. माध्यमिक शिक्षक (मराठी/इंग्रजी माध्यम, नॉनपेसा) आणि उच्च माध्यमिक शिक्षक (पेसा व बिगरपेसा) संवर्गातील एकूण १६७ पैकी १५२ उमेदवार उपस्थित होते. तर १५ उमेदवार गैरहजर होते.

जिल्ह्यात आजपासून 'राष्ट्रीय पोषण माह'

लोकसत्ता प्रतिनिधी

नाशिक : जिल्हा परिषदेचा महिला व बाल विकास विभाग आणि एकात्मिक बाल विकास सेवा योजना यांच्या वतीने नऊ सप्टेंबर ते नऊ ऑक्टोबर या कालावधीत जिल्ह्यात 'राष्ट्रीय पोषण माह २०२६'चे आयोजन करण्यात येणार आहे. 'आमची अंगणवाडी, आमची जबाबदारी' या संकल्पनेच्या माध्यमातून अंगणवाडी केंद्रांच्या कार्यक्षेत्रात पोषण, आरोग्य, बालसंगोपन आणि बालविकास विषयक विविध उपक्रम राबवून जनजागृती करण्यात येणार आहे.

या माध्यमातून आहारातील विविधता, पुरेशा प्रथिनांचा आहार, ताजा व गरम शिजवलेला आहार, स्थानिक समुदायाची मालकी व जबाबदारी, बालकांच्या विकासासाठी पोषण व बालपणातील उद्दीपन तसेच प्रधानमंत्री मातृ वंदना योजना या प्रमुख विषयांवर नागरिकांमध्ये व्यापक जनजागृती करण्याच्या सूचना दिल्या आहेत. अंगणवाडी केंद्रांच्या माध्यमातून स्थानिक पातळीवर उपलब्ध असलेल्या पौष्टिक पदार्थांचा आहारात समावेश करण्याबाबत पालक व नागरिकांना मार्गदर्शन करण्यात येणार आहे. अंतर्गत पात्रता, मिळणारे लाभ, लाभार्थींचे हक्क आणि अर्ज प्रक्रियेबाबत जनजागृती करणार असल्याची माहिती महिला व बालविकास विभागाचे जिल्हा कार्यक्रम अधिकारी प्रताप पाटील यांनी दिली.

सेविकांमार्फत नियमित गृहभेटी

'आमची अंगणवाडी, आमची जबाबदारी' या संकल्पनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी अंगणवाडी व्यवस्थापन समिती अधिक सक्रिय करण्यात येणार आहे. शून्य ते तीन वर्षे वयोगटातील बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी सुधारित गृहभेट वेळापत्रकानुसार अंगणवाडी सेविकांमार्फत नियमित गृहभेटी घेण्यात येणार आहेत.

गिरणा गौरव प्रतिष्ठानतर्फे वृत्तपत्र विक्रेत्यांचा सन्मान

नाशिक : येथील गिरणा गौरव प्रतिष्ठानच्या वतीने वृत्तपत्र विक्रेत्यांचा कृतज्ञता सोहळा ज्येष्ठ साहित्यिक, माजी आमदार नानासाहेब बोरस्ते यांच्या उपस्थितीत हुतात्मा स्मारकात पार पडला. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ लेखक सावळीराम तिदमे होते.

प्रतिष्ठानच्या वतीने तीन वर्षांपासून सुरू असलेल्या ह्यपुस्तकावर बोलू काहीह्न उपक्रमाचा ३०० वा भाग पूर्ण झाल्याबद्दल नाशिकरोड, नवीन नाशिक, मध्य नाशिक, सातपूर आदी भागांतील ३०० वृत्तपत्र विक्रेत्यांचा सन्मान करण्यात आला. आजपर्यंत या उपक्रमात सहभागी झालेल्या ३०० साहित्यिकांबरोबरच या उपक्रमातून मिळालेल्या मौलिक माहितीबद्दल रसिकांनी मनोगत व्यक्त केले. ज्येष्ठ साहित्यिक प्राचार्य प्र. द. कुलकर्णी, नाशिकरोड वृत्तपत्र विक्रेता सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष सुनील मगर, नाशिक मध्य वृत्तपत्र विक्रेता संघटनेचे अध्यक्ष चंद्रकांत पवार, नवीन नाशिक वृत्तपत्र सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष दत्ताजी ठाकरे, सातपूर वृत्तपत्र संघटनेचे अध्यक्ष राजू अनमोल आदी उपस्थित होते. या मान्यवरांनीही मनोगतात सामाजिक जडणघडणीत वृत्तपत्रांचे आणि वृत्तपत्र विक्रेत्यांचे महत्त्व अधोरेखित केले.

कुटुंबाचे खरे सोबती

ऊनवारा, थंडी, पाऊस यांची पर्वा न करता वृत्तपत्र विक्रेते आपली सकाळ प्रसन्न करतात. प्रतिकूल परिस्थितीवर मात करत जगण्याचा संदेश देणारे वृत्तपत्र विक्रेते हे केवळ व्यावसायिक नसून आपल्या कुटुंबाचे खरे सोबती आहेत, असे माजी आमदार बोरस्ते यांनी सांगितले.

निसर्ग फेरीत २० प्रजातींच्या १५० फुलपाखरांची नोंद

'बिग बटरफ्लाय मंथ' साजरा

लोकसत्ता वृत्तविभाग

येवला : 'बिग बटरफ्लाय मंथ'निमित्त रविवारी नाशिक येथे सिटिझन सायन्स नाशिक आणि अरन्यानी बायो कन्झर्वेशन नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने अनोखा 'नेचर वॉक' आयोजित करण्यात आला होता. या उपक्रमात सहभागी तीन गटांनी '१५ मिनिट काउंट मेथड' या शास्त्रीय पद्धतीने फुलपाखरांची गणना केली. यावेळी २० विविध प्रकारच्या तब्बल १५० फुलपाखरांची नोंद करण्यात आली.

फुलपाखरांचे संवर्धन, जैवविविधतेचे महत्त्व आणि निसर्ग निरीक्षणाबाबत नागरिकांमध्ये जनजागृती व्हावी, तसेच फुलपाखरांच्या विविध प्रजातींची शास्त्रीय पद्धतीने नोंद व्हावी, या उद्देशाने सिटिझन सायन्स नाशिक आणि अरन्यानी बायो कन्झर्वेशन नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने 'नेचर वॉक' उपक्रम घेण्यात आला. या उपक्रमात सहभागी नागरिकांना फुलपाखरांचे निरीक्षण, त्यांची ओळख आणि संवर्धन याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. याप्रसंगी डॉ. ॲग्नेस खरात, डॉ. श्रीश क्षीरसागर, डॉ. विजय बर्वे आणि सतीश गोगटे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचा समारोप फुलपाखरू उद्यानात करण्यात आला.

कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी अनंत सरोदे आणि डॉ. अदिती शेरे खरवार यांनी उपस्थितांचे आभार मानले. दरम्यान, एफडीसीएम, नाशिकच्या वन विभागाने सर्व उपस्थितांना मोफत प्रवेश देऊन या उपक्रमाला सहकार्य केले.

'१५ मिनिट काउंट मेथड'

या उपक्रमात सहभागी तीन गटांनी '१५ मिनिट काउंट मेथड' या शास्त्रीय पद्धतीने फुलपाखरांची गणना केली. यावेळी २० विविध प्रकारच्या तब्बल १५० फुलपाखरांची नोंद करण्यात आली. डॉ. ॲग्नेस खरात, संजना काजवे, डॉ. श्रीश क्षीरसागर, डॉ. अदिती शेरे खरवार, डॉ. विजय बर्वे, सतीश गोगटे, अनंत सरोदे, सीमा तांगडपल्लिवार, वेद शिंदे, अनिरुद्ध जाधव, कौस्तुभ मसुरकर, राजेंद्र कोतकर, अदिती कोतकर, पद्मजा ओतुरकर, संग्राम गोवर्धने, विजय कुलकर्णी, विनिता कुलकर्णी, मिलिंद पिटकर, श्रेयस द्विवेदी, अर्जुन सरोदे, श्रीमती सरोदे आणि हार्दिका यांनी सहभाग घेतला. नाशिकमध्ये प्रथमच अशा प्रकारचा अनोखा उपक्रम आयोजित करण्यात आल्याने निसर्गप्रेमी व फुलपाखरू अभ्यासकांमध्ये उत्साहाचे वातावरण होते.

सीएफएम ॲसेट रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड
thoughtful regeneration
कॉर्पोरेट कार्यालय : १ला मजला, वेकफिल्ड हाऊस, स्प्रॉट रोड, बॅलार्ड पूर्व, मुंबई - ४०००३८

ताबा सूचना
(स्थावर मालमत्तेसाठी)

परिशिष्ट ४ — नियम ८ (१) सहवाचता

ज्याअर्थी, निम्नस्वाक्षरीकार हे सीएफएम ॲसेट रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेडचा (सीएफएमएआरसी ट्रस्ट-१९६चा विश्वस्त या क्षमतेत) अधिकृत अधिकारी असून त्यांनी सिक्युरिटायजेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड इन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (५४, २००२) अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२च्या नियम ३ सहवाचता निर्देशित कलम १३(१२), १३(२) अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, सदर नोटीस मिळाल्याच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत नोटीसमध्ये नमूद केलेली रक्कम परत करण्यासाठी मागणी नोटीस जारी केली. यापुढे, सर्वग्राम फिनकेअर प्रायव्हेट लिमिटेड यांनी, सरफेसी कायदा २००२च्या कलम ५च्या तरतुदींनुसार, सर्वग्राम फिनकेअर प्रायव्हेट लिमिटेड आणि सीएफएम ॲसेट रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड यांच्यात दिनांकित ०४.११.२०२५ रोजी झालेल्या नोंदणीकृत हस्तांतरण करारनाम्याद्वारे, वरील निर्देशित कर्ज खात्याच्या संपूर्ण थकबाकी कर्जाचे, अंतर्निहित प्रतिभूतींसह, आपले सर्व हक्क, मालकी आणि हितसंबंध सीएफएम ॲसेट रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेडच्या नावे हस्तांतरित केले आहेत.

कर्जदारांनी रक्कम परतफेड न केल्यामुळे, याद्वारे कर्जदारांना आणि सर्वसामान्य जनतेला सूचना देण्यात येत आहे की, निम्नस्वाक्षरीकार यांनी सदर निर्देशित नियमांच्या नियम ८ सहवाचता सदर निर्देशित कायद्याच्या कलम १३ (४) अन्वये, त्याला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, वर "ताब्याची तारीख" सदर या रकान्यात नमूद केलेल्या तारखेला, वर वर्णन केलेल्या मालमत्तेचा प्रतीकात्मक ताबा घेतला आहे. बँकेने घेतलेल्या गहाण मालमत्तेच्या ताब्यासह पक्षकारांचा तपशील खालीलप्रमाणे आहेः-

ग्राहक (कर्जदारांचे)/सह-कर्जदार आणि जामीनदार/भागीदार/गहाण ठेवणारे यांचे नाव	मागणी सूचना दिनांक आणि रक्कम रु. मध्ये.	ताबा तारीख
अधिक धोंडीराम शंकर (कर्जदार), **शंकर भिकाजी मोरे** (सह-कर्जदार), **हिराबाई शंकर मोरे** (सह-कर्जदार), **कर्ज खाते क्र.: बीएलएसईसी०००००००५५**	मागणी सूचना दिनांकः **०८-०५-२०२६** **रु. ३,००,४९२/-** (रुपये तीन लाख चारशे ब्याण्णव फक्त) दि. २०-०३-२०२६ रोजीनुसार	०७-०९-२०२६
तारण ठेवलेली मालमत्ताः धारण मालमत्ता येथे शिरसगाव गाव, ता. निफाड, जि. नाशिक खालीलप्रमाणे आहे, ग्राम मिळकत क्र. ९९, मालमत्तेचे वर्णन २४२.०० चौ. फूट (२२.४९ चौ.मीटर), ग्राम मिळकत क्र. १०४, मालमत्तेचे वर्णन ८१.०० चौ. फूट (७.५२ चौ.मीटर), ग्राम मिळकत क्र. १२९, मालमत्तेचे वर्णन १५३.०० चौ.फूट (१४.२१ चौ.मीटर) चार सीमाः- पूर्वः विठोबा राधाजी मोरे यांचे घर, पश्चिमः राजाराम संतु अरगडे यांचे घर, उत्तरः भाऊसाहेब प्रभाकर अरगडे यांचे घर, दक्षिणः रस्ता		
पांडुरंग दत्तू शिंदे (कर्जदार), **छाया पांडुरंग शिंदे** (सह-कर्जदार), **सकुबाई दत्तू शिंदे** (सह-कर्जदार), **कर्ज खाते क्रमांकः एफएलएसईसी०००००४७४५**	मागणी सूचना दिनांकः **०८-०५-२०२६,** **रु. ४,६८,०५०/-** (रुपये चार लाख अडुसष्ट हजार पन्नास फक्त) दि. २०-०३-२०२६ रोजीनुसार	०७-०९-२०२६
तारण ठेवलेली मालमत्ताः मालमत्ता क्र. १ गट क्र. ५५२ क्षेत्रफळ - ०.२३.०० एच.आर. येथे स्थित गाव भायाळे ता. चांदवड जि. नाशिक. चार सीमाः- मालमत्ता क्र. २ गट क्र. ५५४ क्षेत्रफळ - ०.२४.०० एच.आर. त्यावर बांधलेल्या फार्म हाऊस सह, ग्रामपंचायत मालमत्ता क्र. ३७४/अ, येथे स्थित गाव भायाळे, ता. चांदवड, जि. नाशिक., चार सीमाः - पूर्वः गट क्र.५५५ ८ १६२, पश्चिमः गट क्र. ५५०, उत्तरः गट क्र. ५५५, दक्षिणः गट क्र. ५५३.		
किशोर भाऊसाहेब जाधव (कर्जदार), **भाऊसाहेब संतोष जाधव** (सह-कर्जदार), **सुनंदा भाऊसाहेब जाधव** (सह-कर्जदार), **कर्ज खाते क्रमांकः बीएलएसईसी०००००११४१**	मागणी सूचना दिनांकः **०८-०५-२०२६,** **रु. १३,७१,१५०/-** (रुपये तेरा लाख एकाहत्तर हजार एकशे पन्नास फक्त) दि. २०-०३-२०२६ रोजीनुसार	०७-०९-२०२६
गहाण ठेवलेली मालमत्ताः गाव - चिंचवड, तालुका - मालेगाव, जिल्हा - नाशिक, मालमत्ता गट क्र. ६३२/२, क्षेत्रफळ (एच.आर) १-००, चार सीमाः- पूर्वः गट क्र. ६३४, पश्चिमः गट क्र. ६३१,६५४, उत्तरः गट क्र. ६३३, दक्षिणः गट क्र. ६१०,६११,६१२.		
अशोक निंबा पवार (कर्जदार), **संगीता अशोक पवार** (सह कर्जदार), **कर्ज खाते क्रमांकः एफएलएसईसी०००००३९६२**	मागणी सूचना दिनांकः **०८-०५-२०२६,** **रु. ११,५५,०८०/-** (रुपये अकरा लाख पंचावन्न हजार ऐंशी फक्त) दि. २०-०३-२०२६ रोजीनुसार	०५-०९-२०२६
गहाण ठेवलेली मालमत्ताः मालमत्ता क्र. १: गाव-कौतिकपाडा, ता.-बागलान, जि.-नाशिक- ४२३३०१, गट क्र. ७१, मोजमापे क्षेत्रफळ (एच. आर) ०.३० पो के एच हे. आर ०.०. चार सीमा :- पूर्वः गट क्र. ७०, पश्चिमः गट क्र. ७२.७३, उत्तरः गट क्र. ६९, दक्षिणः गट क्र. ६१. **मालमत्ता क्र. २:** गट क्र. ७४, पैकी क्षेत्रफळ (हे. आर) ०.०७, पो के एच हे. आर ०.००, एएसएस रु.०.०८. चार सीमाः- पूर्वः गट क्र. ७६, पश्चिमः गट क्र. ७५.७६, उत्तरः गट क्र. ६८, दक्षिणः गट क्र. ७७ **मालमत्ता क्र. ३:** गट क्र. ७६ क्षेत्रफळ (एच. आर) ०.२७ पो के एच एच. आर ०.०० एएसएस रु. ३१. चार सीमाः- पूर्वः गट क्र. ७४, पश्चिमः गट क्र. ८०.८२, उत्तरः गट क्र. ७५, दक्षिणः गट क्र. ७७		
बाळू साहेबराव बागुल (कर्जदार), **साहेबराव मुरलीधर बागुल** (सहकर्जदार), **शोभा साहेबराव बागुल** (सहकर्जदार), **कर्ज खाते क्रमांकः एफएलएसईसी०००००५८२०**	मागणी सूचना दिनांकः **०७-०५-२०२६,** **रु. १२,२८,१००/-** (रुपये बारा लाख अठ्ठावीस हजार शंभर फक्त) दि. २०-०३-२०२६ रोजीनुसार	०३-०९-२०२६
गहाण ठेवलेली मालमत्ताः मालमत्ता क्र. १: गट क्र. ७५२ क्षेत्रफळ (हेक्टर एएआर) ०.४०+०.०० आर. पी.के., येथे स्थित गाव पाटोदा, ता. येवला, जि. नाशिक. चार सीमाः- पूर्वः मोकळी जमीन, पश्चिमः मोकळी जमीन, उत्तरः गट क्र. ७५१, दक्षिणः गट क्र. ७५३ **मालमत्ता क्र. २:** मिळकत क्र.- १२७८ क्षेत्रफळ २७.८७ चौ. मी.- येथे स्थित गाव पाटोदा. ता. येवला, जि. नाशिक. चार सीमाः- पूर्वः मोकळी जमीन, पश्चिमः मोकळी जमीन, उत्तरः गट क्र. ७५१, दक्षिणः गट क्र. ७५३		
दागु रेवजी गागटे (कर्जदार), **अमोल दागू गागरे** (सह-कर्जदार), **प्रियंका अमोल गागरे** (सह-कर्जदार), **रेवजी नामदेव गागटे** (सह-कर्जदार), **कर्ज खाते क्रमांकः एफएलएसईसी०००००६४६५**	मागणी सूचना दिनांकः **०७-०५-२०२६,** **रु. ६,१८,२८७/-** (रुपये सहा लाख अठरा हजार दोनशे सत्त्याऐंशी फक्त) दि. २०-०३-२०२६ रोजीनुसार	०३-०९-२०२६
तारण ठेवलेली मालमत्ताः गट क्र. १५८, मोजमापे क्षेत्रफळ (एच.आर) ०.०६.०० + पी.के. ०.००.०० एच.आर, (ग्रामपंचायत मालमत्ता क्र. ०२३३ सह) येथे स्थित वाघदर्दी, ता. चांदवड, जि. नाशिक. चार सीमाः पूर्वः गट क्र. १५७, पश्चिमः गट क्र. १६०, उत्तरः गट क्र. १५५/डी, दक्षिणः गट क्र. १५९.		
गौरव राजेंद्र देवरे (कर्जदार), **राजेंद्र जिभाऊ देवरे** (सह-कर्जदार), **संगीता राजेंद्र देवरे** (सह-(कर्जदार), **कर्ज खाते क्रमांकः एफएलएसईसी०००००६८८४**	मागणी सूचना दिनांकः **०७-०५-२०२६,** **रु. ८,२३,१६०/-** (रुपये आठ लाख तेवीस हजार एकशे साठ फक्त) दि. २०-०३-२०२६ रोजीनुसार	०३-०९-२०२६
गहाण ठेवलेली मालमत्ताः गट क्र. १७४, क्षेत्रफळ (एच आर) ०.५७ + ०.०० आर. पी.के., येथे स्थित गाव वरहाणे ता. मालेगाव, जि. नाशिक. चार सीमाः- पूर्वः शिव, पश्चिमः गट क्र. १७३, उत्तरः गट क्र. १५४, दक्षिणः गट क्र. १७५		
कडू रतन हिरे (कर्जदार), **विमलबाई कडू हिरे** (सह-कर्जदार), **कर्ज खाते क्रमांकः एफएलएसईसी०००००७६६५**	मागणी सूचना दिनांकः **०७-०५-२०२६,** **रु. ७,९६,६४५/-** (रुपये सात लाख शहाण्णव हजार सहाशे पंचेचाळीस फक्त) दि. २०-०३-२०२६ रोजीनुसार	०३-०९-२०२६
तारण ठेवलेली मालमत्ताः गट क्र. ४०६/३, क्षेत्रफळ (हेक्टर, आर) ०.४०+ ०.०० आर. पी. के., येथे गाव निंबयती ता. मालेगाव, जि. नाशिक. चार सीमाः- पूर्वः शिवाजी मोतीराम हिरे यांची मालमत्ता, पश्चिमः मंगलबाई दीपक हिरे यांची मालमत्ता, उत्तरः बाळू शिवाजी बनसोडे यांची मालमत्ता, दक्षिणः विश्वनाथ शिवाजी हिरे यांची मालमत्ता		
ज्ञानेश्वर सुभाष बिडगर (कर्जदार), **वाल्ह्याबाई सुभाष बिडगर** (सह-कर्जदार), **सविता कांतिलाल नरोटे** (सह-कर्जदार), **कर्ज खाते क्रमांकः एफएलएसईसी०००००८५०८**	मागणी सूचना दिनांकः **०७-०५-२०२६,** **रु. ६,०२,०५६/-** (रुपये सहा लाख दोन हजार छप्पन्न फक्त) दि. २०-०३-२०२६ रोजीनुसार	०३-०९-२०२६
तारण ठेवलेली मालमत्ताः मालमत्ता क्र. १- गट क्र. ८०, क्षेत्रफळ चांदवड, जि. नाशिक. (हेक्टर आर) १.००.००+०.०३.०० आर. पी.के., येथे स्थित गाव रापळी, ता. चांदवड, जि. नाशिक, चार सीमाः- पूर्वः गट क्र. ८२, पश्चिमः रस्ता, उत्तरः गट क्र. ७९, दक्षिणः गट क्र. ८३ आणि ८१.		
विकास केडा देवरे (सह-कर्जदार), **सुमनबाई केडा देवरे** (सह-कर्जदार), **केडा दादाजी देवरे** (सह-कर्जदार), **कर्ज खाते क्रमांकः एफएलएसईसी०००००५५५६**	मागणी सूचना दिनांकः **०७-०५-२०२६,** **रु. १८,२३,८९६/-** (रुपये अठरा लाख तेवीस हजार आठशे शहाण्णव फक्त) दि. २०-०३-२०२६ रोजीनुसार	०५-०९-२०२६
तारण ठेवलेली मालमत्ता : प्लॉट मालमत्ता, जी नाशिक जिल्ह्यातील बागलाण तालुक्यात, काकडगाव गावात स्थित आणि वसलेली आहे, गट क्र. १३४, एकूण जमिनीपैकी, जमिनीचे क्षेत्रफळ एच.०.४९.०० + ०.००.०० आर.पी.के. चार सीमाः- पूर्वः गट क्रमांक १३०, १३१, १३३, पश्चिमः १४३१३८१३०, उत्तरः गट क्रमांक १२९, १३६, दक्षिणः नाला.		
कमलेश अभिमान धोंडगे (कर्जदार), **वर्षा अभिमान धोंडगे** (सहकर्जदार), **अभिमान भिका धोंडगे** (सह-कर्जदार), **संकेत अभिमान धोंडगे** (सह-कर्जदार), **कर्ज खाते क्रमांकः एफएलएसईसी०००००५७३७**	मागणी सूचना दिनांकः **०७-०५-२०२६,** **रु. १७,४०,६९६/-** (रुपये सतरा लाख चाळीस हजार सहाशे शहाण्णव फक्त) दि. २०-०३-२०२६ रोजीनुसार	०५-०९-२०२६
तारण ठेवलेली मालमत्ताः खामलोन गावात स्थित आणि वसलेली मालमत्ता, ता. मालेगाव, जि. नाशिक, गट क्रमांक ३००, क्षेत्रफळ एकूण अंदाजे ११.१.७०.००+०.००.०० आर.पी.के., एकूण जमिनीपैकी, जमीन क्षेत्रफळ ११.०.८६.०० +०.००.०० आर.पी.के. चार सीमाः- पूर्वः रस्ता, पश्चिमः ३०२, ३०२, उत्तरः गट क्रमांक २९८, २९९, दक्षिणः गट क्रमांक ३०१.		
संदिप शंकर गोसावी (कर्जदार), **पूनम संदिप गोसावी** (सह-कर्जदार), **प्रभाबाई शंकर गोसावी** (सह-कर्जदार), **समाधान शंकर गोसावी** (सह-कर्जदार), **कर्ज खाते क्रमांकः एफएलएसईसी०००००६२२७**	मागणी सूचना दिनांकः **०७-०५-२०२६,** **रु. ६,९५,०४६/-** (रुपये सहा लाख पंच्याण्णव हजार शेहचाळीस फक्त) दि. २०-०३-२०२६ रोजीनुसार	०५-०९-२०२६
तारण ठेवलेली मालमत्ताः मालमत्ता क्र. १- अराई गावात स्थित असलेली मालमत्ता, ता. बागलाण, जि. नाशिक गट क्र. ३५१, मोजमापे एकूण क्षेत्रफळ सुमारे एच.१८.३० +०.०१ आर.पी.के. चार सीमाः- पूर्वः गट क्र. ३५६, पश्चिमः गट क्र. ३४९,३४८, उत्तरः गट क्र. ३५२,३५३,३५४, दक्षिणः गट क्र. ३५० **मालमत्ता क्र. २-** मालमत्ता अराई गाव, ता. बागलाण, जि. नाशिक या ठिकाणी स्थित आणि वसलेली आहे, गट क्रमांक ६९९, मोजमापे एकूण क्षेत्रफळ अंदाजे एच.०.१९.२०+०.०० आर.पी.के. चार सीमाः- पूर्वः गट क्र. ३५१.९६८, पश्चिमः गट क्र. ७०, उत्तरः गट क्र. ७०१, दक्षिणः गट क्र. ६८५		
ज्ञानेश्वर उत्तम देवरे (कर्जदार), **प्रियांका ज्ञानेश्वर देवरे** (सह-कर्जदार), **मनोहर उत्तम देवरे** (सह-कर्जदार), **उत्तम नारायण देवरे** (सह-कर्जदार), **कर्ज खाते क्रमांकः एफएलएसईसी०००००६४००**	मागणी सूचना दिनांकः **०७-०५-२०२६,** **रु. ९,९७,४५४/-** (रुपये नऊ लाख सत्त्याण्णव हजार चारशे चौपन्न फक्त) दि. २०-०३-२०२६ रोजीनुसार	०५-०९-२०२६
तारण ठेवलेली मालमत्ताः काकडगाव गाव, ता. बागलाण, जि. नाशिक येथे स्थित असलेली मालमत्ता गट क्रमांक १३१, मोजमापे एकूण क्षेत्रफळ अंदाजे एच.२.१९.००+०.२५.०० आर.पी.के. एकूण जमिनीपैकी, जमिनीचे क्षेत्रफळ एच.०.९९.००+०.२१.०० आर.पी.के. चार सीमाः- पूर्वः गट क्रमांक ५४, पश्चिमः गट क्रमांक १३३, उत्तरः १३०, दक्षिणः गट क्रमांक नाला.		
शिवम हंसराज जोंधळे (कर्जदार), **मनीषा हंसराज जोंधळे** (सह-कर्जदार), **हंसराज बाबुराव जोंधळे** (सह-कर्जदार), **कर्ज खाते क्रमांकः बीएलएसईसी०००००२८७२**	मागणी सूचना दिनांकः **०७-०५-२०२६,** **रु. १२,५२,९५४/-** (रुपये बारा लाख बावन्न हजार नऊशे चौपन्न फक्त) दि. २०-०३-२०२६ रोजीनुसार	०५-०९-२०२६
तारण ठेवलेली मालमत्ताः मालमत्ता गाव महालपाटणे, तालुका देवळा, जि. नाशिक या परिसर